**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 16.08.2025** **वार- शनिवार**

---

**डेंग्यू**

पिंपरी-चिंचवड शहरात ऑगस्ट महिन्यात डेंग्यूच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. गेल्या 14 दिवसांत 12 जणांना डेंग्यूची लागण झाली असून, एकंदर रुग्णसंख्या 33 झाली आहे तर मलेरियाचे 27 रुग्ण आढळले आहेत. डेंग्यू, मलेरियासारखे कीटकजन्य आजार रोखण्यासाठी 7 लाख घरांची तपासणी करण्यात आल्याचं पिंपरी महापालिकेच्या आरोग्य विभागानं सांगितलं. ऑगस्ट महिन्यात आत्तापर्यंत 11 हजार 580 तापाचे रुग्ण आढळले यामध्ये डेंग्यूच्या 317 संशयित रुग्णांपैकी 12 जणांचा अहवाल पॉझिटीव आला आहे.

**लंपी**

पुणे जिल्ह्यातील लंपी चर्मरोग प्रादुर्भावग्रस्त भागात उपचार, कीटक नियंत्रण आणि जनजागृती मोहीम सुरू आहे. पशुपालकांनी घाबरून न जाता जनावरांचं लंपी प्रतिबंधात्मक लसीकरण करून घ्यावं आणि पशुवैद्यकीय

अधिकाऱ्यांच्या सूचनांचं पालन करण्याचं आवाहन पुणे पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. यांनी केलं आहे. लंपीमुळं राज्यातील 9 हजार 820 पशुधन बाधित असून 6 हजार 618 जनावरं उपचारानंतर बरी झाली आहेत. आतापर्यंत 339 जनावरांचा या रोगामुळं मृत्यू झाला आहे. राज्यात 93 टक्केपेक्षा जास्त गोवंशीय पशुधनाचं लसीकरण पूर्ण झालं आहे. पुण्यातील पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेमध्ये व्यावसायिक तत्वावर लसनिर्मिती लवकरच करण्यात येणार आहे.

**<u>बळकट</u>**

मुंबई महापालिकेच्या धर्तीवर पुणे महापालिकेची क्षेत्रीय कार्यालयं बळकट केली जाणार आहेत. त्यासाठी अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली 8 जणांची समिती स्थापना करण्यात आली आहे. पुणे शहराची वाढती लोकसंख्या पाहता क्षेत्रीय कार्यालयांवर कामाचा ताण येत आहे. क्षेत्रीय स्तरावर तक्रारी सोडविण्याच्या दृष्टीनं आणि उपाययोजना करण्यासाठी आयुक्त नवल किशोर राम यांनी ही समिती स्थापन केली आहे. ही समिती येत्या 15 दिवसांत अहवाल सादर करणार आहे.

**<u>पवना-बारणे</u>**

पिंपरी-चिंचवडसह मावळवासीयांची तहान भागविणारं पवना धरण 95 टक्के भरलं आहे. मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते

आज या धरणाचं जलपूजन करण्यात आलं. वर्षभर पुरेल एवढं पाणी धरणात साठलं आहे. धरणातील गाळ काढल्यामुळं पाणी साठवण क्षमता वाढल्याचं खासदार बारणे याप्रसंगी बोलताना म्हणाले. पीएमआरडीए आणि पिंपरी-चिंचवड महापालिका नदी स्वच्छ राहावी यासाठी नदीकाठच्या गावात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणार आहेत अशी माहिती त्यांनी दिली.

**<u>आरोग्य</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे नागरी आरोग्य पोषण दिनानिमित्त जाधववाडी इथं आयोजित मोफत आरोग्य शिबिरात नागरिकांनी सहभाग घेतला. या शिबिरात आकुर्डी रुग्णालयाच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकानं नागरिकांना विविध तपासणींसह आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसंच विविध तज्ज्ञांचं मार्गदर्शन देण्याबरोबरच सर्व प्रकारच्या औषधांचं मोफत वितरण करण्यात आलं. यापुढील काळात नागरी आरोग्य पोषण दिनाच्या अंतर्गत महापालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये मोफत आरोग्य शिबिरं आयोजित करण्यात येणार आहेत. नागरिकांनी शक्य तितक्या संख्येनं उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घेण्याचं आवाहन वैद्यकीय विभागाच्यावतीनं करण्यात आलं आहे.

**<u>तरतूद</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अर्थसंकल्पात नागरिकांना सक्रिय सहभाग नोंदवता यावा, यासाठी महापालिका गेल्या काही वर्षांपासून उपक्रम राबवत आहे. या उपक्रमांतर्गत यावर्षीच्या अर्थसंकल्पात पुनावळे इथले नवे रस्ते,  चऱ्होलीतील सुधारीत पादचारी मार्गांसाठी निधी देण्यापासून ते रावेतमधील नवीन पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे.  नागरिकांनी सुचवलेल्या योजनांसाठी त्यांच्या परिसरात वसूल होणाऱ्या मालमत्ता कराच्या 10 टक्के निधीची तरतूद केली जाते. त्यानुसार गेल्या वर्षी सर्वात जास्त लाभ ड प्रभागाला झाला आहे.

**<u>एनजीओ</u>**

महाराष्ट्र एनजीओ समितीचं राज्यस्तरीय अधिवेशन येत्या मंगळवारी पुण्यात गणेश कला-क्रीडा मंच इथं आयोजित केलं आहे. राज्यभरातील स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येनं या अधिवेशनात सहभागी होणार असल्याची  माहिती समितीचे राज्य अध्यक्ष डॉक्टर युवराज येडूरे यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. या अधिवेशनात महाराष्ट्रातील सामाजिक समस्या, विकास आणि शासनाच्या तसंच कंपन्यांच्या सीएसआर निधीतून विविध उपक्रम राबवण्यासाठी चर्चा आणि ठराव केले जाणार आहेत असं येडूरे यांनी स्पष्ट केलं.

**<u>संबोधन</u>**

करिअरच्या संधींचं पर्याय शोधताना विद्यार्थ्यांनी केवळ कोणत्या कंपनीत आपल्याला नोकरीची संधी हवी आणि मोठं आर्थिक पॅकेज देणाऱ्या पर्यायांना प्राधान्य देण्याऐवजी नवनवीन गोष्टी,अद्ययावत तंत्रज्ञान शिकण्याची संधी मिळेल अशा ठिकाणी नोकरीच्या संधी शोधायला हव्यात असं मत क्विक हिल टेक्नॉलॉजीजचे व्यवस्थापकीय संचालक कैलाश काटकर यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापन विज्ञान संस्थेत काल विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बोलत होते.

**<u>मोबाईल</u>**

पुण्यातील शिवाजीनगर परिसरात राहणाऱ्या नागरिकांचे 5 लाख रुपये किंमतीचे हरवलेले 41 मोबाईल स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात पोलीस उपायुक्त कृषीकेश रावले आणि सहायक पोलीस आयुक्त साईनाथ ठोंबरे यांच्या हस्ते परत करण्यात आले.

**<u>साठा</u>**

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीत आज सकाळी 6 वाजेपर्यंत 25 टीएमसीपेक्षा अधिक म्हणजे 88 टक्के पाणीसाठा झाला आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा 98 टक्के होता. 1 जूनपासून खडकवासला धरणाच्या सांडव्यातून नदीपात्रात 12 टीएमसीपेक्षा

अधिक पाण्याचा विसर्ग करण्यात आल्याची माहिती पाटबंधारे विभागातर्फे देण्यात आली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**